महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक - ४२२ ००३.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
NASHIK DIVISIONAL BOARD ,NASHIK – 422 003

गट/सर्वे नं.१५६०/१ आडगांव शिवार, न्यू इंग्लिश स्कूलजवळ, मुंबई आग्रा रोड, आडगांव, नाशिक
Website : www.sscboardnashik.com Telephone : 0253 2945241, 2945251 Email : nsksec@rediffmail.com

**परिपत्रक**

क्र. नाविमं/लेखा/नोंदणी शुल्क/2880
नाशिक – ४२२ ००३
दिनांक :– ११/०८/२०२६

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व
कनिष्ठ महाविद्यालये,
नाशिक, धुळे, जळगाव व नंदुरबार जिल्हे

विषय:– सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षाकरीता नोंदणी शुल्क लिंक उपलब्ध करुन देण्याबाबत.
संदर्भ:– १. राज्य मंडळाचे क्र. रा.मं./लेखा–११/३१३०, दिनांक २७/०७/२०२६ रोजीचे पत्र.
२. राज्य मंडळाचे क्र.रा.मं./लेखा–११/३३६१, दिनांक १०/०८/२०२६ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, सन २०२५–२६ पासून शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे नोंदणी शुल्क (Registration Fee) भरण्याची प्रक्रिया Online करण्यात आली आहे. सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षाकरिता नोंदणी शुल्क (Registration Fee) राज्यमंडळाचे अधिकृत संकेतस्थळ **www.mahahsscboard.in** वर दि.२७/०७/२०२६ पासून प्रचलित पध्दतीने शुल्क आकारणी करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

१. संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून मार्च २०२६ परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थी संख्येनुसार नोंदणी शुल्क निर्धारित करण्यात आलेले आहे.
२. दिनांक १५ ऑगस्ट २०२६ नंतर प्रचलित पध्दतीनुसार दंडात्मक शुल्कासह नोंदणी शुल्क Online पध्दतीने भरणा करावयाचे आहे.

फेब्रुवारी/मार्च २०२६ परीक्षेची नियमित विद्यार्थी संख्या गृहीत धरुन नोंदणी शुल्काचा तपशील खालील तक्त्याप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विद्यार्थी संख्या | १० वी नोंदणी शुल्क | १२ वी नोंदणी शुल्क |
|---|---|---|---|
| १ | ०१ ते १०० विद्यार्थ्यापर्यंत | रु.१,०००/– | रु.१,०००/– |
| २ | १०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यांसाठी | रु.२००/– | रु.४००/– |

वरीलप्रमाणे विहित मुदतीत इ.१०वी व इ.१२वी नोंदणी शुल्क भरणा न केल्यास खालीलप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

| अ. क्र. | दिनांक | दंडाची रक्कम |
|---|---|---|
| १ | १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२६ | रु.२००/– |
| २ | ०१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२६ | रु.३००/– |
| ३ | ०१ ऑक्टोबर नंतर नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखेपर्यंत | रु.२००/– |

३. सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांना मंडळामार्फत दरमहा शिक्षण संक्रमण अंक छापील स्वरुपात देण्यात येत होता. यापुढे माहे जुलै २०२६ पासून शिक्षण संक्रमण अंक Digital स्वरुपात विनाशुल्क मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत असून शिक्षण संक्रमण शुल्काची रक्कम रु.५००/— आकारण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

तरी सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयानी त्यांच्या लॉग इन (Log in) वरुन ऑनलाईन पध्दतीने नोंदणी शुल्क भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

11/8/26

( सरोज जगताप )
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक — ४२२ ००३.

प्रत माहितीस्तव :—

मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे — ०४